# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

जा.क्र. मनपा/नर/ ६७७/२०१८-१९

Bhd. (Legal) 1803

दिनांक:- ०२/०५/२०१८

## // भोगवटा दाखला //

प्रति,

1) मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो. (वास्तुविशारद)
101, वेस्ट व्ह्यू, अे-2, सेक्टर-II,
शांती नगर, मिरारोड (पूर्व), जिल्हा ठाणे - 401107

2) श्री. दिलेश चंद्रकांत शहा (अधिकारपत्रधारक)
हर्ष प्लाझा, पहिला माळा, शांती विहार, मिरारोड (पूर्व)

विषय- मौजे नवघर, स.क्र. (जुना) 459/4 (नविन) 113/4 या जागेतील प्रस्तावित इमारत (स्टिल्ट + 19) (वास्तुविशारद प्रस्तावित "युनिक ओरम-II" इमारत टाईप - इ, (विंग इ) ) साठी भोगवटा दाखला मिळणेबाबत.

संदर्भ-
1) मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो., (वास्तुविशारद) यांचा दि.27/03/2018 रोजीचा अर्ज.
2) मे. सक्षम अधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील 10(3),10(5) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली नसल्याबाबत विकासकाने रु.300/- च्या स्टॅम्प पेपरवर दि. 22/03/2018 रोजी दिलेले शपथपत्र.
3) मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील क्र. महसूल/क-1/टे-1/एनएपी/नवघर-ठाणे/एसआर-31/2012, दि.19/04/2012 अन्वयेचे अकृषिक आदेश.
4) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील पत्र क्र. मनपा/नर/5486/2015-16, दि.31/03/2016 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.
5) मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो., (वास्तुविशारद) यांचेकडील दि.19/03/2018 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.
6) मे. हिरेन तन्ना यांनी इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्यतेबाबतचा (Structural Stability Certificate) दि.12/03/2018 रोजीचा दाखला
7) परवानाधारक मे. विजय गुरव ॲण्ड असो., यांचा दि.18/07/2017 रोजीचा प्लबींग बाबतचा दाखला.
8) रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पाची उभारणी केलेबाबतचे पाणीपुरवठा विभागाकडील पत्र क्र.मनपा/पापु/1356/2017-18, दि.05/07/2017अन्वयेचे प्रमाणपत्र.
9) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/405/2017-18, दि.19/08/2017 अन्वयेचे अंतिम नाहरकत दाखला सादर केलेला असून पत्र क्र.मनपा/अग्नि/1552/2017-18, दि.15/03/2018 अन्वये मुदतवाढ सादर
10) सोलार वॉटर हिटींग सिस्टीम बसवून कार्यान्वीत केलेबाबतचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील जा.क्र. मनपा/साबां/2827/2017-18, दि.07/07/2017 अन्वयेचा दाखला.
11) उद्यान व वृक्षप्राधिकरण यांचेकडील पत्र क्र. मनपा/वृप्रा/मिरारोड/223/2017-18, दि.17/07/2017 अन्वये नाहरकत दाखला.
12) विकासकाचे दि.22/03/2018 रोजीचे शपथपत्र.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

जा.क्र. मनपा/नर/ ६४७/ २०१८-१९ दिनांकः- ०२/०५/२०१८

Bhd. (Legal) 1803

महोदय,

विषयांकित जागेमधील **मौजे नवघर, स.क्र. (जुना) 459/4 (नविन) 113/4** या जागेतील **रहिवास वापराची प्रस्तावित इमारत (स्टिल्ट + 19) (वास्तुविशारद प्रस्तावित "युनिक ओरम-II" इमारत टाईप - इ, (विंग इ) )** एकूण क्षेत्र **7401.44 चौ.मी. रहिवास क्षेत्रासाठी** साठी As Built नकाशाप्रमाणे वास्तुविशारद **मे. अविनाश म्हात्रे ॲन्ड असो., (नोंदणी क्र. सीए/75/1274)**, यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत संरचना अभियंता **मे. हिरेन तन्ना** यांनी व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक **मे. विजय गुरव ॲण्ड असो.**, यांनी दाखले दिलेले आहेत. यास्तव सदर **इमारत (स्टिल्ट + 19) (वास्तुविशारद प्रस्तावित "युनिक ओरम-II" इमारत टाईप - इ, (विंग इ) )** साठी खालील अटीशर्तींच्या अधिन राहुन इमारतीसाठी मंजुर नकाशाप्रमाणे भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

**अटीशर्ती -**

1) संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वयेच्या बांधकाम परवानगी / सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तींचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 12 अन्वयेच्या शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

2) जर

अ) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.

ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत

3) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

4) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

5) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.

6) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.

7) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरू असलेल्या दाव्याबाबत मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

8) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.22/03/2018 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मलनिस्सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

9) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सदर दाखला वेळी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

10) संदर्भिय पत्र क्र.11 मधील हमीपत्रांचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

11) रेखांकनामधील वाहनतळाची जागा जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

( बी.जी. पवार ) २६/४

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक

2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग